 आर.सी.सी. १२५/२०२२
सरकार वि. नारायण व इतर
**निशाणी ३७**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ५ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,**

माझे नाव — सुनिता सतीष चौधरी, वय — ४० वर्षे,
व्यवसाय — शेती, राहणार — धामणगाव पाट,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. आरोपी हे आमचे घराचे शेजारी राहतात. घटना अंदाजे दोन–अडीच वर्षापुर्वी दुपारी धामणगाव पाट येथे आमच्या शेतात घडली होती. त्यावेळी आमच्यामध्ये व आरोपींमध्ये जमिनीच्या कारणावरून किरकोळ शाब्दीक वादावादी झाली होती. या व्यतिरीक्त काही घडले नव्हते. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नव्हता.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १५.०५.२०२२ रोजी दुपारी ०२:०० वाजता मी, माझा पती व मुलगा घरी असताना माझा भाचा किरण गुंजाळ हा आमच्या घरी आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आम्ही त्यास सांगितले की, आरोपी हे आम्हाला आमच्या घराशेजारील जागेत घरकुल बांधू देत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी किरण गुंजाळ याने आरोपींना समजावून सांगितले की, माझी आत्या सुनिता यांना त्यांच्या जागेत घरकुल बांधू द्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी किशोर

चौधरी याने त्याच्या हातातील गजाने किरण याच्या डोक्यात मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, प्रियंका हीने हातातील दगडाने किरण यास मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती व माझा मुलगा सार्थक मध्ये पडलो असता सर्व आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आम्हास तुम्हाला येथे घरकुल बांधू देणार नाही, तुम्ही येथे कसे राहता तेच पाहतो असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केली.

३. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकुर वाचुन दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलिसांनी तो माझ्या जबाबामध्ये का नमुद केला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मजकूर मी पोलीसांना सांगितला होता व तो पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे नमूद केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामध्ये तडजोड झाली असल्यामुळे व आरोपींना शिक्षा होऊ नये म्हणुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. डी. पोखरकर यांच्या मार्फत**

उलटतपास नाकारला.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.01.12 17:00:26 +0530

दिनांक १२.०१.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.